असुधारित प्रत

# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक ११ मार्च, २०१५
## (सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे -

दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

तीन : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)

चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-

(दिनांक १० मार्च, २०१५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु चर्चा न झालेल्या लक्षवेधी सूचना क्र. १ व २ )

(१) **सर्वश्री शरद सोनावणे, छगन भुजबळ, जितेंद्र आव्हाड, संदीप नाईक, दिलीप वळसे-पाटील, भास्कर जाधव, रमेश कदम, राहुल जगताप, शशिकांत शिंदे, हसन मुश्रीफ, प्रतापराव पाटील चिखलीकर, हेमंत पाटील, प्रकाश सुर्वे, श्रीमती प्रणिती शिंदे, सर्वश्री राणा जगजितसिंह पाटील, राहुल मोटे, किसन कथोरे, सुरेश भोळे, तुकाराम काते, बच्चु कडू, सुनिल प्रभु, अजय चौधरी, सुरेश गोरे, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री अर्जुन खोतकर, मनोहर भोईर, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री बसवराज पाटील, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री विजय वडेट्टीवार, अमित झनक, श्रीमती वर्षा गायकवाड, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री भारत भालके, राधाकृष्ण विखे-पाटील, रवि राणा, समिर मेघे, सुधीर पारवे, सुधाकर देशमुख, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, सुधाकर कोहळे, डॉ. आशिष देशमुख, डॉ. सुनिल देशमुख, सर्वश्री लक्ष्मण जगताप, सुभाष देशमुख, गुलाबराव पाटील, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री अनिल बाबर, दत्तात्रय भरने, ॲड वारीस पठाण, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री अजित पवार, राजेश टोपे, वैभव पिचड, चंद्रदीप नरके, प्रा. चंद्रकांत सोनवणे, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री हनुमंत डोळस, राजाभाऊ वाजे, भाऊसाहेब कांबळे, अमिन पटेल, ॲड. राहुल कुल, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, नागपूर या शहरांसह संपूर्ण राज्यात दिनांक २३ फेब्रुवारी २०१५ पर्यंत १२,००० नागरिकांना स्वाईन फ्लूची लागण होऊन त्यामध्ये ९९ नागरिकांना जीव गमवावा लागल्याची बाब माहे फेब्रुवारी

२०१५ मध्ये व त्या सुमारास निदर्शनास येणे, सन २००९ पासून सातत्याने ठराविक वेळात हा आजार बळावत असणे, प्रतिवर्षी रुग्ण संख्येत वाढ होत असणे, स्वाईन फ्लू संदर्भात असणाऱ्या साथ नियंत्रण कायदा (एपिडेमिक ॲक्ट) लागू असूनही शहरातील रुग्णालयांमध्ये टॅमी फ्लू प्रतिबंधात्मक लस सारखी औषधांचा तुटवडा निर्माण झाला असणे, शासकीय रुग्णालयातील असमन्वय व अपुऱ्या यंत्रणेमुळे नागरिक हवालदिल झालेले असणे, स्वाईन फ्लूच्या प्रतिबंधासाठी व्हेंटीलेटर, स्प्रे मास्क इ. खाजगी व शासकीय रुग्णालयात उपलब्ध नसणे, खाजगी रुग्णालयांमध्ये व खाजगी प्रयोगशाळेमध्ये या आजाराच्या तपासणीसाठी अव्वाच्या सव्वा पैसे घेतले जात असणे, परिणामी शासकीय व निमशासकीय रुग्णालयात स्वाईन फ्लुसाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याची आवश्यकता, स्वाईन फ्लूची साथ राज्यात झपाट्याने पसरत असून सदर साथ रोखण्यास शासनाला आलेले अपयश परिणामी या गंभीर आजाराला आळा घालण्यासाठी शासनाने उपाययोजना करुन राज्यातील सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री सरदार तारासिंह, रुपेश म्हात्रे, अजित पवार, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, रमेश कदम, सुनिल प्रभु, अजय चौधरी, डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मु. पो. ता. भिवंडी (जि.ठाणे) येथील मालोडी-रावत्याचापाडा येथील महात्मा ज्योतीबा फुले संचलित प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेतील २५ विद्यार्थ्यांना अन्न व दुषित पाण्यातून विषबाधा होऊन कॉलरा व गॅस्ट्रोची लागण झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस येणे, त्यापैकी १२ विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक असणे, या आश्रम शाळेत पहिली ते दहावी या वर्गात शिकणारे सुमारे ४०० विद्यार्थी वसतीगृहात वास्तव्यास असून एका सामाजिक संस्थेने केलेल्या अन्नदानातून तसेच आश्रमशाळेतील दूषित पाणी व निकृष्ट धान्यामुळे शाळकरी मुलांना सदर लागण झाल्याचे निदर्शनास येणे, वसई रोडवरील या आश्रम शाळेत व्यवस्थापकांतर्फे देण्यात येणारी निकृष्ट अन्न व दूषित पाणी याबाबत वेळोवेळी तक्रारी करण्यात येऊनही कोणतीही उपाययोजना करण्यात न येणे, या सर्व प्रकाराची उच्चस्तरीय समिती मार्फत सखोल चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी, व्यवस्थापक व संबंधित ठेकेदार यांच्याविरुध्द तातडीने कारवाई करण्यात न आल्यामुळे या निवासी आश्रम शाळेत वास्तव्यास असलेल्या मुलांचे आई-वडील, पालक, नातेवाईक यांचे मनात मुलांच्या जिविताबद्दल निर्माण झालेली भिती व चिंता, या संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या बेफिकीर वतर्नाबद्दल निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

(३) **सर्वश्री राणा जगजितसिंह पाटील, हसन मुश्रीफ, राहुल मोटे, जितेंद्र आव्हाड, अमिन पटेल, विजय वडेट्टीवार, ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"रायगड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक बहिष्काराची अनेक प्रकरणे उघडकीस येत असणे, रायगड जिल्ह्याबरोबर औरंगाबाद येथे एम.आय.डी.सी. सिडको भागामध्ये गोत्र न जुळल्याने लग्नास जातपंचायतीचा विरोध असल्याने गुन्हे दाखल होणे, जातपंचायती मार्फत संबंधित महिलेकडून जवळजवळ एक लाख पंचेचाळीस हजार इतकी रक्कम वेगवेगळ्या दंडापोटी वसूल करणे, रेणुकाई पिंपळगाव ता.भोकरदन, जि.जालना येथेही सामाजिक बहिष्कारातून वेगवेगळ्या १२ स्मशानभूमी असणे, रायगड जिल्ह्यात रोह्यात वाळीत टाकल्याने मोहिनी तळेकर या महिलेने गावकीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या करणे, म्हसळा जि.रायगड येथे कोळे गावातील सरपंचावर सामाजिक बहिष्कार टाकणे, त्याचेकडून जबरदस्तीने १९ हजार ५०० रुपये इतका दंड वसूल करणे, त्याबाबत तक्रार देणेसाठी गेले असता म्हसळा पोलीसांमार्फत गुन्हा दाखल करणे विषयी टाळाटाळ होणे, पोलादपूर जिल्हा रायगड येथील भोगाव ग्रामपंचायतीत श्री.राहुल येलगे या एव्हरेस्ट विराला सुध्दा गावकऱ्यांनी वाळीत टाकणे, दुसऱ्या जातीतील मुलगी करुन ती जीन्स घालते या कारणासाठी येलगे पती-पत्नीचा मानसिक छळ करणे, ते रहात असलेले घर गुरांचा गोठा जाळण्याचा प्रयत्न करणे, या वाळीत प्रकरणाची संपूर्ण राज्यभर चर्चा सुरु असताना रायगड जिल्ह्यातील सामाजिक बहिष्काराची जवळपास ४६ प्रकरणे उजेडात येणे, यापैकी फक्त २८ प्रकरणात गुन्हे दाखल प्रकरणापैकी तब्बल १७ प्रकरणे राज्य सरकारकडे दोषारोप पत्र दाखल करण्याचा मंजुरीसाठी प्रलंबित असणे, याच पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा पालकमंत्री यांनी वाळीत प्रकरणात शासनाने काय पडावे? अशा आशयाचे वादग्रस्त विधान करणे, बहुतांशी वाळीत प्रकरणे ही वैयक्तिक वादातून होत असल्याचा जीवईशोध लावणे, सामाजिक दृष्टया अतिशय महत्वाच्या असणारी वाळीत प्रकरणे थांबविण्यासाठी शासनाने वेळीच करावयाच्या उपाययोजनाबाबत जिल्हा प्रशासन असंवेदनशील असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

**पाच : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस).**

**सहा : शासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

(१) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१५.

(२) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री. हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) विधेयक, २०१५.

(३) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र दिवाणी न्यायालय (सुधारणा) विधेयक, २०१५.

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(१) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अबू आसिम आजमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१४ नापसंत करते."

(२) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१५.

(३) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री धैर्यशील पाटील, सुभाष ऊर्फ पंडीतशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १० मार्च, २०१५

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.